# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 24.09.2026** **वार : गुरुवार**

---

## ठळक बातम्या

1. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी.
2. दुष्काळबाधित शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
3. गणेशोत्सवाच्या चैतन्य पर्वाची उद्या सांगता; प्रशासन सज्ज.
4. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या भारत्तोलन स्पर्धेत भारताच्या 'मीराबाई चानू'ला रौप्यपदक.

## सविस्तर बातम्या

**मुख्यमंत्री-नुकसान पाहणी**

मराठवाड्यासह राज्यातल्या अनेक जिल्ह्यांत यावर्षी अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. या संकटकाळात शासन पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं असून, आवश्यक ती सर्व मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काल मुख्यमंत्र्यांनी लातूर, धारशिव आणि सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. खरीप हंगामातली पिकं हातची गेल्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्यासाठी राज्य शासन तात्काळ उपाययोजना सुरू करत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले...

***आम्ही सर्व प्रकारची मदत त्या ठिकाणी करणार आहोत. आपल्याला मी कालच कल्पना दिली आहे. शनिवारपूर्वी आपला दुष्काळाचा जीआर देखील बाहेर पडेल आणि त्यानंतर आपण उपाययोजना सुरू करू आणि शेतकऱ्यांना रब्बीचा हंगाम घेता येईल या दृष्टीनं जी काही मदत करायची आहे. ती मदत करणं असेल त्यासोबत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणं असेल, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था करणं असेल या सगळ्या गोष्टी राज्य सरकार करेल आपण कर्जमाफी केली आहे, तीही इफेक्टिवली राबवण्याचा प्रयत्न आमचा आहे आणि त्याही दृष्टीनं पुढचं कार्य जे आहे ते आम्ही करू जी काही थेट आपल्याला आर्थिक मदत करायची आहे. ती मदत देखील आम्ही लवकरात लवकर याठिकाणी करण्याचा प्रयत्न करणार आहोत. जेणेकरून काही ना काही दिलासा आपल्या शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे.***

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, शेतकऱ्यांचं सुमारे 48 हजार कोटी रुपयांचे कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केलं असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**उपमुख्यमंत्री-नुकसान पाहणी**

विदर्भातील दुष्काळाचा शासन गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्याबाबत निर्णय घेणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. त्यांनी काल बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातल्या चितोडा इथं बांधावर जाऊन दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी केली. पावसाने दडी मारल्याने विदर्भातील सोयाबीन, मका, कपाशी, उडीद, मूग या सर्वच पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर लवकरच शासन निर्णय जाहीर करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देईल, अशी माहिती त्यांनी दिली.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची तसेच पाणी परिस्थितीची पाहणी केली. कोणत्याही परिस्थितीत शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**शेतकऱ्यांशी संवाद**

परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली तर, नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनीही काल नाशिक जिल्ह्यातील विविध भागात दुष्काळ सदृष्य स्थितीची पहाणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

**गडचिरोली-आंदोलन**

गडचिरोली जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या गडचिरोली जिल्हा शाखेच्या वतीने काल जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं.

**आयुर्वेद दिवस-नागपूर**

आयुर्वेद, जीवनशैलीशी संबंधित आजारांना प्रतिबंध करण्याबरोबरच निरोगी आरोग्य राखण्यासाठी सर्वंकष दृष्टिकोन देतो, असं प्रतिपादन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. नागपुर मध्ये काल आयोजित करण्यात आलेल्या, 11व्या आयुर्वेद दिनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला त्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केलं. यंदाच्या आयुर्वेद दिनाची संकल्पना 'निरोगी भविष्यासाठी आयुर्वेद' अशी आहे.

भारतीय जीवनशैली आणि आयुर्वेद शास्त्र ही निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे, असं प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं. काल मुंबईत 'आयुर्वेद दिना'निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**सेवा संकल्प अभियान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक सेवेची 25 वर्ष पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियान या आमच्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया अंतराळ क्षेत्रात खासगी क्षेत्राला सक्षम करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या इन स्पेस या संस्थेविषयी...

***अंतराळ क्षेत्र आता भारतीय खासगी नवोपक्रमांसाठी एक खुलं क्षेत्र बनलं आहे. अंतराळात खासगी क्षेत्राचा सहभाग सुलभ करण्यासाठी सरकारनं 2020 मध्ये एक स्वायत्त एकल खिडकी संस्था म्हणून 'इन स्पेस'ची स्थापना केली.***

*ही संस्था खासगी संस्थांना प्रक्षेपक आणि उपग्रह निर्मितीसाठी आवश्यक परवानग्या मिळवून देणं तसंच 'निर्मितीपासून ते डेटा विक्री पर्यंत'च्या संपूर्ण मूल्य साखळीतल्या कार्यांना प्रोत्साहन देऊन नियमन करण्याचं काम करते.*

*भारतीय अंतराळ स्टार्ट अप आता प्रक्षेपक आणि उपग्रहांची निर्मिती करतात. याबरोबरच इस्रो चे कार्यही सुरू असून ही संस्था वैज्ञानिक आणि सामरिक मोहिमांवर लक्ष केंद्रित करत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी माधुरी कुलकर्णी पुणे.*

**महिला शेतकरी-प्रमाणपत्र**

17 ऑक्टोबर पर्यन्त चालणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत राज्यभरातील पात्र महिला शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार असून त्यांना प्रमाणपत्रांचं वितरण करण्यात येत आहे, अशी माहिती कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी दिली. राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनारचे काल मुंबईत आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

या वेबिनारमध्ये महिला शेतकरी प्रमाणपत्राची पात्रता, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ग्रामसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका तसेच प्रमाणपत्राच्या आधारे उपलब्ध होणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

**पुणे-गणेशोत्सव**

पुण्यातील वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सवाला राज्यासह देश परदेशातील नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला. गेले दहा दिवस सुरू असलेल्या या उत्सवात शहरातल्या प्रमुख गणेश मंडळांच्या दर्शनासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मानाचे पाच गणपती तसेच विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी साकारलेले आकर्षक देखावे पाहण्यासाठी पुणे शहरासह परिसरातून नागरिक मोठ्या संख्येने येत आहेत.

दरम्यान, उद्या 25 तारखेला अनंत चतुर्दशीला होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा आणि महापालिका प्रशासनाने विशेष नियोजन केलं असून, अनेक ठिकाणी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचं पालन करून विसर्जन मिरवणुकीचा आनंद घ्यावा असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. गणेश विसर्जन मिरवणूक सुरक्षित आणि शिस्तबद्धपणे पार पाडण्यासाठी पुणे पोलीसही सज्ज झाले आहेत. मिरवणुकीच्या मार्गावर सुमारे साडेतीन हजार सीसीटीव्ही कॅमेरे आणि वॉच टॉवरद्वारे नजर ठेवली जाणार आहे. त्याचबरोबर ड्रोनच्या माध्यमातूनही मिरवणुकीचे चित्रीकरण करण्यात येणार आहे. विसर्जनासाठी सुमारे दहा हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**सिंधुदुर्ग**

जैवविविधतेनं समृद्ध असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सर्पविश्वातली एक अत्यंत दुर्मिळ आणि लक्षवेधी नोंद समोर आली आहे. या घटनेमुळे सिंधुदुर्गातल सर्पवैविध्य आणि त्यातल्या अनोख्या रंगवैविध्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे. ऐकू या याविषयी अधिक माहिती...

*सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिल्यांदाच पावशी गावात पांढऱ्या रंगाची अल्बिनो मण्यार आढळून आली. सर्पमित्र अनिल गावडे आणि प्राणी अभ्यासक डॉ. योगेश कोळी यांनी ही नोंद केली. कुडाळ वनक्षेत्रपाल चेतन पाटील आणि वनपाल सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली या दुर्मिळ सापाला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आलं.*

*मण्यार हा विषारी साप असून त्याच शास्त्रीय नाव बुंगारस कॅर्युलियस आहे. सामान्यतः काळसर किंवा निळसर-काळ्या रंगाचा असणारा मण्यार अल्बिनो अवस्थेत पांढऱ्या रंगाचा दिसतो. पूर्ण अल्बिनिझममध्ये डोळ्यांमध्येसुद्धा रंगद्रव्याचा अभाव असल्यान डोळे लालसर दिसू शकतात. अल्बिनिझम ही आनुवंशिक रंगद्रव्याच्या कमतरतेशी संबंधित अवस्था आहे. ल्युसिस्टिक आणि अल्बिनो सापांमधला फरक ओळखण वैज्ञानिक नोंदीसाठी महत्त्वाच आहे, अस डॉ. योगेश कोळी यांनी सांगितल. सिंधुदुर्गातील ही दुर्मिळ नोंद जिल्ह्याच्या सर्पवैविध्य आणि जैवविविधतेच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली आहे एवढ मात्र नक्की. आकाशवाणी बातम्यांसाठी निलेश जोशी, सिंधुदुर्ग.*

**<u>आशियाई क्रीडा स्पर्धा</u>**

जपानमधे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत **भारोत्तोल**न स्पर्धेत, भारताच्या मीराबाई चानूनं काल महिलांच्या 49 किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावलं.

**बॅडमिंटन**च्या उपांन्त्य फेरीत चीननं भारतावर 3-1 अशी मात केल्यामुळे भारताला कांस्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**महिला नेमबाजी**त भारताच्या महेश्वरी, परिणाझ धालीवाल आणि रायझा ढिल्लन यांनी सांघिक स्कीट प्रकारात कांस्यपदक जिंकलं. नेमबाजीत मनू भाकरला महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तुल प्रकाराच्या अंतिम फेरीत पाचव्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**सॉफ्ट टेनिस**च्या उपांत्य फेरीत भारताच्या जय मीना याला जपानच्या ताकुया याच्याकडून 2-4 असा पराभव पत्करावा लागल्यामुळे त्याला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. या क्रीडाप्रकारातलं भारताचं हे पहिलंवहिलं पदक ठरलं आहे. या स्पर्धेत आतापर्यंत 12 पदकांसह भारत पदकतालिकेत 13 व्या स्थानावर आहे.

**<u>सांगली, गडचिरोली-पाऊस</u>**

सांगली आणि गडचिरोली जिल्ह्यांच्या विविध भागात काल दुपारी मेघगर्जनेसह पाऊस पडला. नाशिक जिल्ह्यातील विविध भागांमध्ये सुमारे दीड महिन्याच्या विश्रांतीनंतर पावसाने हजेरी लावली आहे. सिन्नर तालुक्यात एका शेत मजुरावर वीज कोसळल्याने त्याचा मृत्यू झाला तर अन्य दोन मजूर गंभीर जखमी झाले.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या विविध भागात आजही मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.